# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

# Savitribai Phule Pune University
**(Formerly Pune University)**
**Ganeshkhind, Pune – 411007**

दुरध्वनी क्र.: ०२०-२५६२११८८/८९/९०
Telephone : 020-25621188/89/90
इ-मेल/Email: - affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/9e34

दिनांक : 12/12/2025

प्रती,

मा. प्राचार्य/संचालक

सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था

**विषय: मानसिक आरोग्य व कल्याण समिती स्थापन करणे, संस्थात्मक धोरण सादर करणे आणि संलग्नित गुगल फॉर्मला प्रतिसाद देणे.**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य व कल्याण कार्यबलाच्या सूचनांनुसार व मार्गदर्शक तत्वांनुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना संस्थात्मक स्तरावर **मानसिक आरोग्य व कल्याण समिती** स्थापन करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

समितीची कार्ये खालीलप्रमाणे असतील:

- विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे व कर्मचारी वर्गाची मानसिक सुरक्षितता व भावनिक सुदृढतेस प्राधान्य देणारे, सर्वसमावेशक, सहयोगी व संवेदनशील वातावरण निर्माण करणे.
- प्रतिबंधात्मक, प्रवर्धक व प्रतिसादात्मक उपाययोजनांद्वारे मानसिक आरोग्याशी संबंधित आव्हानांची ओळख पटविणे व त्यांचे निराकरण करणे.
- जागरूकता कार्यक्रम, लवकर ओळख यंत्रणा आणि सुलभ सहाय्य सेवा उपलब्ध करून देणे.

याव्यतिरिक्त, प्रत्येक संस्थेने वरील तत्त्वांवर आधारित **मानसिक आरोग्य व कल्याण धोरण** तयार करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये संस्थेची बांधिलकी, धोरणात्मक उपक्रम आणि मानसिक आरोग्य संरक्षणासाठीची कार्यपद्धती नमूद केलेली असेल.

तयार करण्यात आलेले धोरण दस्तऐवज संस्थेच्या मान्यतेनंतर mhwc.sppu@gmail.com या मेलवर **२४ डिसेंबर २०२५** पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

सर्व प्राचार्य/संचालक यांनी या विषयास प्राधान्य देऊन विहीत मुदतीत अंमलबजावणी करावी, ही विनंती.

**कृपया संलग्नित गुगल फॉर्म पूर्ण करून आपला प्रतिसाद १५ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत सादर करावा.**
https://forms.gle/w1hVX8s9ifzVSSDc7

कळावे,

आपली,

उपकुलसचिव,
संलग्नता कक्ष